Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ५१ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.११ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.



# कुस्तीचा ‘सिकंदर’ अखेर झाला महाराष्ट्र केसरी



**पुणे । प्रतिनिधी**

कुस्तीच्या पंढरीत गंगावेस तालमीत मेहनत घेणाऱ्या सिंकदर शेखने अवघ्या साडे पाच सेकंदात ६६व्या महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला. अंतिम फेरीच्या लढतीत सिकंदरने प्रतिस्पर्धी शिवराज राक्षेला ५.३७ सेकंदाला झोळी डावावर चितपट केले.प्रदीपदादा कंद व पुणे जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि भारतीय कुस्ती महासंघ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या सहकार्याने ६६ वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. फुलगाव येथील सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेमध्ये स्पर्धा झाली.

अंतिम फेरीच्या लढतीत सिकंदरचे पारडे निश्चित जड होते. पण, शिवराज त्याला आव्हान देईल अशी अपेक्षा होती. मात्र, वेगवान आणि आक्रमक कुस्ती खेळणाऱ्या सिकंदरपुढे शिवराजचा निभाव लागला नाही. लढतीला सुरुवात झाल्यावर अवघ्या काही सेकंदात सिकंदरने झोळी डाव घेत शिवराजला उचलून खाली घेतले आणि त्याच स्थितीत शिवराजला चितपट करून विजेतेपदाचा मान मिळविला.पारितोषिक वितरणप्रसंगी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष खासदार रामदास तडस, मुरलीधर मोहोळ, स्वागताध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सदस्य प्रदीप कंद, कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, विलास कथुरे, योगेश दोडके यावेळी उपस्थित होते. विजेत्या सिकंदरला थार गाडी, गदा असे पारितोषिक देण्यात आले. उपविजेता शिवराज ट्रॅक्टरचा मानकरी ठरला.त्यापूर्वी, माती विभागात झालेल्या अंतिम लढतीत पहिल्या फेरीतच सिकंदरने संदीपवर सातत्याने ताबा मिळवत सलग दोन गुणांचा सपाटा लावला आणि दहा गुणांची वसुली करत तांत्रिक वर्चतस्वावर विजय मिळवून किताबी लढतीत प्रवेश केला होता. गादी विभागात शिवराज राक्षेने कमालीचा चपळपणा दाखवत हर्षद कोकाटेचा तांत्रिक वर्चस्वावर पराभव करून अंतिम फेरी गाठली.

# पत्रकारांनी निस्पृह व निर्भीडपणे लिखाण केले पाहिजे-तिराणिक



**आनंदवन (वरोरा) । प्रतिनिधी**

मनात कुणाविषयी द्वेष, मत्सर, आकस, ममभाव न बाळगता पत्रकारांनी लोकहित जोपासत जनकल्याणार्थ पारदर्शकपणे ,निस्पृह व निर्भीड पणे लिखाण केले पाहिजे. लोकशाही हा केंद्रबिंदू लक्षात घेता पत्रकारांनी आर्थिक विवंचनेत जाऊन राजकीय मानसिकतेच्या गुलामगिरीत पत्रकारिता करू नये. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून जनहितार्थ कल्याणसाठी लढणारा पत्रकार ही प्रचलित आख्यायिका अनेक विचारवंत ,लेखक व मातबर संपादक ,पत्रकारांनी अनेक दशकापासून जोपासत ठेवली आहे . ती सध्याच्या परिस्थितीत अबाधित ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. कालांतराने काही दशकापासून 'कालची – आजची– उद्याची 'पत्रकारितेमध्ये बदल होताना दिसते आहे. हे लोकशाहीच्या दृष्टीने विचार मंथन करणारी बाब असून, घातक प्रवृत्तीचे लक्षण आहे. पत्रकारांच्या लेखणीमध्ये ग्राम, गाव शहर जिल्हा राज्य व देश यामध्ये आमुलाग्र बदल घडवण्याची ताकद आहे. परंतु पत्रकारांच्या लेखणीने राजकीय गुलामगिरीत राहून आपली शाही संपू न देता योग्य दिशेने वाटचाल करीत जनकल्याणार्थ प्रश्नांना प्राधान्य रूप द्यावे तरच लोकशाही शाबूत राहील व जनसामान्यांचे प्रश्न सोडवता येतील असे स्पष्ट व प्रखर मत सामाजिक कार्यकर्ते व जनमंच सदस्य रवींद्र तिराणिक यांनी मांडले .आनंदवन येतील सामाजिक मंच व पत्रकार संघाच्या ओळखपत्र वितरण प्रसंगी ते बोलत होते.

हात लगे निर्माण में, नही मांगणे नही मारणे जगप्रसिद्ध समाजसेवक श्रद्धेय बाबा आमटे व साधनाताई आमटे यांच्या आनंदवन येथील कर्मभूमीत समाधी स्थळाला वंदन करीत नमन होत बाबा आमटे व साधनाताई सोबत घालवलेल्या जुन्या दिवसांची आठवणींना उजाळा देत सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते जनमंच सदस्य ,अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख, महाराष्ट्र अंनिस मार्गदर्शक सल्लागार, कला अकादमीचे संचालक रवींद्र तिराणिक यांनी सामाजिक कार्याच्या चळवळीची जाणीव खऱ्या अर्थाने आनंदवनातून करून दिली . प्रसंगी ग्रामीण विभागातून खडतर पत्रकारिता करीत असताना ग्रामपंचायत सदस्य म्हणून विजय प्राप्त झालेले जगदीश पेंदाम यांचा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. (सामाजिक क्षेत्र व पत्रकारिता ओळख पत्र) अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने प्रदीप कोहपरे, सादिक थैम, प्रशांत बदकी, परमानंद तिराणिक, ग्यानीवंत गेडाम, तुलसीदास अलाम, जगदीश पेंदाम, धर्मेंद्र शेरकुरे, मनोज गाठले, विनोद शर्मा, समीर आसुटकर ,माधव जीवतोडे उपस्थित आदींना सन्मान करीत ओळखपत्र वितरण करण्यात आले

# शेतकरी उत्पादक कंपनीचे राज्यातील पहिले जिनिंग वरोरा येथे सुरू



**वरोरा । प्रतिनिधी**

कापसाखाली सर्वाधिक क्षेत्र असलेल्या विदर्भात प्रक्रिया उद्योगाचा अभाव आहे ही उणीव दूर करीत शेतकरी उत्पादक कंपनीचे राज्यातील पहिले जिनिंग प्रकल्प वरोरा येथील कांचनी शेतकरी उत्पादक कंपनीकडून उभारण्यात आले. त्या जिनिंग प्रकल्पाचे उद्घाटन पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले .

तब्बल १४ कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प पूर्णत्वास गेला असून येत्या हंगामापासून या ठिकाणी शेतकऱ्यांकडून थेट कापसाची खरेदी केली जाणार आहे. राज्यात ३८ ते ३९ लाख आणि एकट्या विदर्भात सुमारे १८ लाख हेक्टर कापसाची लागवड होते. परंतु प्रक्रिया उद्योगाचा अभाव असल्याने हंगामात अपेक्षित दर कापूस उत्पादकांना मिळत नाही. ही बाब लक्षात घेता वरोरा येथील कांचनी फार्मर प्रोड्युसर कंपनीने कापसावर प्रक्रिया करीत गाठी बांधण्याचा हायटेक प्रकल्प उभारलेला आहे. सप्टेंबर २०१७ मध्ये स्थापन झालेल्या या कंपनीचे २०२६ भागधारक असून यशवंत सायरे, बळीराम डोंगरकार ,नितीन टोंगे, सुधीर मत्ते , अनुप वासाडे,संजय ढवस, आशा सायरे, कृपाली पंचभाई आदींचा संचालकामध्ये समावेश आहे. बालाजी धोबे सीईओ यांच्या नेतृत्वात कांचनीची टीम कार्यरत आहे. स्मार्ट प्रकल्पातून दोन कोटी चाळीस लक्ष रुपये या प्रकल्पास आतापर्यंत अनुदान मिळाले असून चिनोरा शिवारात हा प्रकल्प ९.६ एकरावर असून १४ कोटी रुपयांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. याच परिसरात महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाद्वारे अंदाजे २८८ लक्ष रुपयाचे गोडाऊन बांधकामाचे भूमिपूजन सुद्धा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे हस्ते करण्यात आले. त्या गोडाऊन द्वारे शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल शासकीय गोडाऊनमध्ये सुरक्षित ठेवता येईल व मागणीनुसार योग्य किंमत घेऊन विकता येईल. यावेळी या कार्यक्रमांमध्ये आत्मा प्रकल्प संचालक प्रीती हिरळकर उपविभागीय कृषी अधिकारी सुशांत लवाटे, उपविभागीय दंडाधिकारी शिवनंदा लंगडापुरे, तहसीलदार योगेश कौटकर आदी शासकीय अधिकारी तर नरेंद्र जीवतोडे , डॉ अंकुश आगलावे तसेच कांचनी शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व संचालक व शेतकरी तसेच महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अधिकारी सुभाष पुजारी, प्रतीक मुन कंत्राटदार ,माना कंस्ट्रक्शन चे नितीन कळमकर, तेजस कळमकर उपस्थित होते.

## मुली नावाप्रमाणेच प्रतिभावंत हो....!

# आमदार प्रतिभा धानोरकर यांचा मजरा खु येथील शेतकऱ्यांकडून सत्कार

## नुकसान भरपाई मिळालेल्या शेतकऱ्यांनी दिले आशीर्वाद



**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यात असलेल्या मजरा खुर्द येथे नुकताच शेतकऱ्यांतर्फे वरोरा भद्रावती निर्वाचन क्षेत्राच्या लोकप्रिय आमदार प्रतिभा धानोरकर यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी सत्कार झाल्यावर एका ज्येष्ठ शेतकऱ्याने लेकरा आम्हा शेतकऱ्यांना तू न्याय मिळवून दिला . मुली नावाप्रमाणेच प्रतिभावंत हो असे आशीर्वाद देत आम्ही तुझा सोबत आहोत असे मत व्यक्त केले .

वरोरा तालुक्यातील मजरा खुर्द, निमसळा परिसरातील शेतकऱ्यांना बी एस इस्पात स्टिल प्लांट कंपनीकडून नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आमदार धानोरकर यांनी प्रयत्न केला. कंपनीकडून धुळी मुळे झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई ऐन दिवाळीत मिळाल्याने शेतकरी आनंदात आहेत. नुकसान भरपाई मिळाल्याने परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आमदार प्रतिभा धानोरकर यांचा सत्कार केला.तर कंपनीकडून नुकसान भरपाई मिळवून दिल्याने मजरा लहान येथे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी मंचावर सरपंच वंदना निब्रड ग्रामपंचायत सालोरी येन्सा ब्लॉक मजरा लहान सत्कारमूर्ती आमदार प्रतिभा धानोरकर , श्री काळे कृषी अधिकारी, एकनाथ चाफले ग्रामसेवक, प्रमोद तोडासे उपसरपंच, सारिका धाबेकर अध्यक्ष तंटामुक्त समिती, ग्यानीवंत गेडाम सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार सह्याद्रीचा राखणदार, राजेंद्र बोढे ग्रामपंचायत सदस्य ,प्रतिभा मानकर ग्रामपंचायत सदस्य, माधुरी राजुरकर कृषी सहायक, माया बोढे माजी सरपंच, गणेश काळे ग्रामपंचायत सदस्य निमसळा, हर्षद निब्रड ग्रामपंचायत सदस्य, अनिता आत्राम ग्रामपंचायत सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली . कार्यक्रमाचे प्रास्ताविक शुभांगी महाकाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्या करिता परिसरातील सर्व शेतकरी प्रामुख्याने विजय क्षीरसागर विकास खाते, प्रशांत भटारकर , विठ्ठल पढाल यांनी परिश्रम घेतले.रात्री शिवछत्रपती कला प्रबोधन मंडळ दहेगाव चा प्रबोधनात्मक नकलांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचा सर्व गावकऱ्यांनी लाभ घेतला.

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

दुसऱ्या दिवशी अंगणवाडी केंद्र मजरा लहान तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शेतकऱ्याच्या वतीने पुस्तक व पेनचे वाटप करण्यात आले.यावेळी प्रामुख्याने ग्यानीवंत गेडाम, सारिका धाबेकर, प्रशांत भटारकर, विठ्ठल पढाल, विकास गाते , विजय क्षीरसागर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.


# संपादकीय

## देवाच्या अंगणातले दैत्य

केरळ हे निसर्गसुंदर जसे आहे, तसेच ते तुलनेने शांतही आहे. सर्वाधिक सुशिक्षित आणि शंभर टक्के साक्षर असणाऱ्या या राज्यात मार्क्सवादी आणि हिंदुत्ववादी यांच्यातील रक्तरंजित संघर्ष अनेक दशके चालू आहे. सामान्यपणे मार्क्सवाद्यांना त्यांचे मानवी कल्याणाचे उच्चतर ध्येय गाठताना हिंसा त्याज्य वाटत नाही. त्यामुळे, केरळला राजकीय हिंसाचाराची तशी सवय झाली आहे. मात्र, आत्ता झालेले स्फोट हे ख्रिस्ती धर्मातील दोन पंथियांमधील सुप्त संघर्षाचे प्रकट रूप दिसते आहे.'जोहानाज् विटनेस' हा ख्रिश्चनांमधला एक संप्रदाय असून त्याचे मुख्यालय न्यूयॉर्कमध्ये आहे. या संप्रदायाच्या एर्नाकुलम येथील मेळाव्यावर डॉमनिक मार्टिन या दुसऱ्या ख्रिस्ती नागरिकाने हा हल्ला केला. त्याने त्यासाठीची स्फोटके स्वत:च तयार केली होती. त्याने एक व्हिडिओ करून आपणच हे स्फोट घडविले, याची कबुलीही दिली होती. तरीही पोलिसांनी खात्री करून घेतली. आता सीसीटीव्हीवरचे चित्रीकरण आणि इतर पुरावे पाहिल्यानंतर डॉमनिकनेच हे दूरनियंत्रक वापरून केले आहेत, हे स्पष्ट झाले आहेत. डॉमनिकच्या म्हणण्यानुसार या संप्रदायाला इशारा देण्यासाठी त्याने हे कृत्य केले आहे. त्याच्या मते या संप्रदायातील धर्मप्रचारक मुलामुलींना, युवकयुवतींना 'राष्ट्रगीत' म्हणू नका, असे शिकवितात. त्याच्या मते हे चूक आहे आणि त्यासाठी त्याने हा धडा शिकविला आहे.डॉमनिक हा दुबईत काम करीत होता. तो दोन महिन्यांपूर्वीच भारतात परतला होता. एर्नाकुलममध्ये तो इंग्रजी शिकवायचा. सध्या तो कोचीमधील इन्फोपार्कमध्येही काम करीत होता. त्याने व्हिडिओमध्ये केलेले काही दावे योग्य आहेत. मात्र, त्याच्यासारख्या एका एरवी कुटुंबवत्सल आणि आजवर कोणताही गुन्हा न केलेल्या व्यक्तीने आपल्याच धर्माच्या परिषद किंवा संमेलनात स्फोट घडवून माणसे का मारावीत, हे कोडेच आहे. जोहान हा लॅटिन शब्द योहान या हिब्रू शब्दावरून आला आहे. केरळमध्ये हजारो अनुयायी असणाऱ्या 'जोहानाज् विटनेस' या संप्रदायाचे जगभरात ७० लाख अनुयायी असल्याचे सांगितले जाते. हा संप्रदाय तत्त्वत: देशांच्या सीमा मानत नाही. एक ना एक दिवस साऱ्या पृथ्वीवर ईश्वराच्या पुत्राचे एकछत्री राज्य असेल आणि त्याची तयारी आपल्याला आज करायची आहे, अशी या संप्रदायातील भाविकांची श्रद्धा आहे. त्यातूनच कोणत्याही एका देशाच्या राष्ट्रगीताला मान न देण्याची किंवा राष्ट्रगीत न म्हणण्याची भूमिका आली असावी. डॉमिनिक या हल्लेखोराने जो व्हिडिओ तयार केला आहे आणि समाज माध्यमांवर टाकला आहे, त्यात नेमका हाच उल्लेख त्याने केला आहे. मात्र, हे इतकेच कारण आहे की अन्य काही कारणांनी त्याने स्फोट घडविले, हे तपासात स्पष्ट होईल. डॉमिनिकच्या मार्फत इतरही कोणी हे स्फोट घडवून आणले आहेत का, हेही तपासात स्पष्ट होईल.केरळ हे वरवर शांत दिसणारे राज्य अनेक कारणांनी खदखदत आहे. केरळच्या गावागावात प्रचंड पैसा आखात व इतरही देशांमधून येतो. त्यामुळे, छोट्या गावांमध्येही राजमहालासारखे अनेक बंगले दिसतात. ही अफाट समृद्धी आहे. शिक्षण, आयुर्मर्यादा, आरोग्य यातही केरळ पुढे आहे. मात्र, 'केरळ स्टोरी' इतकी मर्यादित नाही. हा स्फोट झाल्या झाल्या ज्या पद्धतीने राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले, त्यावरून याची कल्पना येते. केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी केरळचे मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या अनुनयाच्या राजकारणामुळे हे घडते आहे, अशा प्रकारची टीका केली होती. तिला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी लगेचच नाव न घेता 'जातीय विचार आणि दृष्टी' असणारे दुसरे काय बोलणार, अशा शब्दांत त्यांना उत्तर दिले. याचा अर्थ, राजकीय नेते तपास पुरा होऊन त्यातून काय निघते, या पाहण्याएवढेही थांबायला तयार नसतात. त्यांना त्वरेने राजकीय लाभ उठवायचा असतो. केरळमध्ये 'इंडिया' या विरोधकांच्या एकाच आघाडीत असणारे काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष परस्परांचे प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. हीच स्थिती तेथे बराच काळ आहे. केरळात तिसरा शक्तिशाली धृव इतक्या काळात तयार होऊ शकलेला नाही. त्यामुळे, केरळमध्ये कोणतीही घटना घडली की तिचे राजकियीकरण होण्याचे प्रमाण जास्त आहे. अर्थातच, आयडी स्फोटके बनवून असे हल्ले करण्याची घटना दुर्लक्ष करण्याजोगी नाही. कबुली देणारा संशयित गुन्हेगार हा एकटा नसून त्याच्यामागे इतरही कुणी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. समाजात धार्मिक तेढ म्हणजे केवळ दोन धर्मांमधलीच नसते. एकाच धर्मातले दोन संप्रदायही असे परस्परांच्या विरोधात उभे राहतात. या हल्लेखोराने मांडलेला राष्ट्रगीताच्या विरोधाचा मुद्दा न्यायालयात जाऊन तड लावण्याचा आहे. भारत भूमीवर राहणाऱ्या प्रत्येकाने राष्ट्रगीताचा सन्मान ठेवलाच पाहिजे. मात्र, हे कारण देऊन कोणी हातात शस्त्रे किंवा बाँब घेणार असेल तर ते खपवून घेता येणार नाही. केरळमधील या घटनेचे आता तापत चाललेल्या राष्ट्रीय राजकारणात कसे आणि कितपत पडसाद उमटतात, हे पाहावे लागेल.

# समुद्र सफरींचा इतिहास

'वसुंधरेचे शोधयात्री' हे डॉ. अनुराग लव्हेकर यांचे पुस्तक, शीर्षकाप्रमाणेच नव्या भूभागांच्या शोधार्थ झालेल्या समुद्रावरील साहसी मोहिमांचा दस्तावेज आहे. ख्रिश्चन कालगणना सुरू झाल्यापासूनच्या दोन सहस्रकातल्या जगभरच्या मोहिमांची ही एकत्रित चित्तथरारक वगैरे म्हणता येईल अशी गाथा आहेच; पण हे वरवरचे वर्णन झाले. एवढ्या प्रदीर्घ काळात जगात झालेल्या भौगोलिक आणि ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचेही काही मूल्यमापन ते या अंगाने करू पाहते. इतिहासाला, त्यातल्या दूरगामी बृहत्परिणाम घडवून आणणाऱ्या घटितांना अनेक बाजू, कारणपरंपरा असतात. गेल्या दोन सहस्रकातल्या जगभरातल्या सागरी शोधमोहिमांचा तपशिलात वेध घेताना, त्या प्रत्येकीच्या बऱ्या-वाईट परिणामांचीही सूत्रात्मक नोंद लव्हेकर करतात; त्याने या ग्रंथाला साहसी थरारकथांपलीकडचे संदर्भमूल्य मिळते. हे एका विशिष्ट तिठ्यावरून, तरी पूर्वग्रहविरहित दृष्टीने काळाचा दीर्घ पट्टा न्याहाळणे आहे.लहानपणी गोष्टीतल्या सात सफरींमधून भेटणारा सिंदाबाद, वॉस्को द गामा, कोलंबस, अल्फान्सो अल्बुकर्क, फार तर मार्को पोलो, इब्न बतुता असे इतिहासाच्या पुस्तकात वाचलेले काही पुसटसे उल्लेख. सामान्य वाचकांची धाव एवढ्यातच संपते. या लोकांचे यश आधीच्या कैक यशस्वी, अपयशी मोहिमांच्या खांद्यावर उभे आहे, याची जाणीव हे पुस्तक वाचून होते. धाडसी खलाशांनी प्रायोजक सत्ताधीशांना सादर केलेले प्रस्ताव, जहाजांवरच्या लॉगबुकमध्ये केलेल्या नोंदी, खलाशांनी पाठवलेली पत्रे, कुणी लिहिलेल्या दैनंदिनी यांतून लव्हेकर तपशिलांमधून उद्दिष्ट, प्रत्यक्ष मोहीम, तिचे झालेले परिणाम सांगत आदि-मध्य-अंत अशी कथा मूर्त करतात. त्यातल्या मोकळ्या जागा अट्टाहासाने भरत, त्यातील धाडसाचे उदात्तीकरण करणे टाळतात, हे महत्त्वाचे.राहण्यायोग्य जमिनी, गुलाम, मौल्यवान खनिजे यांचा शोध, व्यापाराच्या संधी अशा अनेक कारणांनी वेगवेगळ्या राजवटी अशा मोहिमा घेत आल्या. या पुस्तकात इतिहासातल्या अशा ठळक मोहिमांचा लेखाजोखा मांडला आहे. मोहीम अपयशी झाली, तरी त्याच्या पुढे आधारभूत होतील अशा तपशिलात नोंदी ठेवल्या जात. प्रवासमार्ग, मधली बेटे-बंदरे, तिथे चालणारा व्यापार, त्याची साधने, राज्यकर्ते आणि समाजजीवन, हवामान-नद्या-पर्वत, प्रवासाला अनुकूल काळ अशा या विस्तृत नोंदींसाठी 'पेरिप्लस' असा शब्द आहे. असा पहिला उपलब्ध पेरिप्लस इसवी सन ४० ते ६० या काळातला तांबड्या समुद्राचा, रोमन राजवटीत तयार झालेला आहे. त्याने या पुस्तकाची सुरुवात होते, तर शेवटी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातली रोआल्ड अमुंडसेन याची ध्रुवीय प्रदेशातील मोहीम येते. दरम्यान पार्श्वभूमी, आफ्रिका, अमेरिका, उर्वरित जग आणि भारताचा संदर्भ अशा पाच भागांतील ३९ प्रकरणांमधून सागरावरचा हा दीर्घ कालपट अनेकांगांनी मूर्त होतो. शेवटी असलेली पारिभाषिक संज्ञा आणि कालपट ही दोन परिशिष्टे उपयुक्त आहेत; पण पुढील अभ्यासाच्या दृष्टीने वापरलेल्या संदर्भग्रंथांची सूचीही असायला हवी होती. शेवटच्या प्रकरणात




लेखक या मोहिमांमागचे उद्देश आणि प्रत्यक्षात त्यांचे झालेले परिणाम यांवर चिंतनात्मक भाष्य करतो, ते महत्त्वाचे आहे.या सफरींचा उपयोग स्वस्त आणि मुबलक गुलामांच्या वाहतुकीसाठी होण्यातून झालेली माणुसकीची दीर्घकालीन विटंबना, स्थानिक जातींवरचे त्यातील काही नामशेष होण्यापर्यंत झालेले अत्याचार, धर्मांतराचा आसुरी आग्रह, डोळे दिपवणाऱ्या नफ्यातून वसाहतवादी स्पर्धा-हिंसाचार यांसह चित्र-शिल्प-संगीत-साहित्यादि कला; तसेच सामाजिक गुणधर्म, जीवनमूल्ये आदींची देवाणघेवाण, मानवी ज्ञानात एकूणच पडत गेलेली भर अशा विधायक बाबींवरही लव्हेकर थोडक्यात, तरी उद्बोधक चर्चा करतात.'भरकटलेले सारेच वाट चुकत नाहीत,' असे जे. आर. आर. टॉल्कीनचे एक अन्वर्थक वाक्य पुस्तकाच्या सुरुवातीलाच येते. 'किनारा तुला पामराला' म्हणत अथांग सागरात अनेक खलाशांनी उज्ज्वल भविष्यासाठी आपली नौका लोटून दिली. त्यातील बरेच भरकटलेही; पण त्यातूनही त्यांनी नवी मळवाट शोधली, तिथून जग बदलांच्या वाटेने गेले. हे पुस्तक म्हणजे त्यातले अपघात, हिंसाचार, त्यातून भरभराटीस आलेला वसाहतवाद, शोषण हे सगळे जमलेला धरूनही, माणसाच्या आजच्या ज्ञानात्मक वाटचालीत असलेले त्यांचे बरे-वाईट योगदान स्मरून, त्यासाठी त्यांना कृतज्ञतेने केलेला सलाम आहे, वाचायलाच हवा असा.

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा असो वा झोपडीत राहणारा प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान ममुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण. दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. गेल्या वर्षी दिवाळी वरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. सुदैवाने यावेळी दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी करता येणार आहे. त्यामुळे लोकांच्या उत्साहाला उधाण आले आहे. या वर्षी महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. हा उत्साह पुढे देखील असाच कायम राहणार आहे कारण दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा, प्रसन्नतेचा उत्सव आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत. गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# राजकीय पुढारी मराठा,धनगर व इतर समाजाच्या मागण्यांचे राजकारणात करीत आहे; सोबतच कलाल-कलार समाजाच्या पारंपरिक(मद्य) व्यवसायाचे सुध्दा राजकारण होत आहे

आज प्रत्येक राजकीय पक्ष आपली पोळी शेकण्याचे काम करीत असल्याचे दिसून येते.यामध्ये सर्वसामान्य समाज व मागासलेला समाज भरडल्या जात आहे.आज मराठा समाज, धनगर,कलाल-कलार, हलबा इत्यादी अनेक समाज वाढती बेरोजगारी व आपल्या हक्काची लढाई लढत तेही देश स्वतंत्र झाल्यानंतर ही गंभीर बाब आहे.परंतु प्रत्येक राजकीय पुढारी व पक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी सर्वसामान्यांचा बळी घेत आहे.आज जरांगे पाटील उपोषणाला का बसले याचाही सर्वंच राजकीय पुढाऱ्यांनी विचार करण्याची गरज आहे.आता राजकीय पक्ष व पुढाऱ्यांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की यापुढे प्रत्येक समाजात अनेक जरांगे पाटील तयार होतील यात दुमत नाही.कारण राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःचे हित साधण्यासाठी संपूर्ण जातीधर्मामध्ये व समाजामध्ये जहर घोळण्याचे काम केले आहे.आज मराठा समाज जेव्हा आरक्षणाची मागणी करीत आहे तर सरकार निजाम काळीन पुरावे मागत आहे.जरांगे पाटलांनी पुन्हा उपोषण सुरू केले तर सरकारमध्ये जनुकाय भुकंप आला की काय असे चित्र दिसुन आले व सरकारने तत्काळ कुणबी नोंदी शोधण्यासाठी मराठवाड्यात राबवलेली मोहीम संपूर्ण राज्यात राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३ नोव्हेंबर २०२३ रोज शुक्रवारला विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले व यासाठी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश सरकारने दिले.ह्या संपूर्ण घटना जरांगे पाटील यांच्या उपोषणामुळे सरकार धास्तावले.असाच रीतसर विचार राज्यातील संपूर्ण समाजाचा व्हायला हवा

रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

मग तो कोणताही समाज असो.इतर समाजाप्रमाणे सरकार गेल्या ७६ वर्षांपासून कलार-कलाल समाजावर सरकार अन्याय करीत आहे. ही बाब सरकार चांगल्याप्रकारे ग्यात आहे की कलाल-कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय मद्य विकने होता आणि आहे.परंतु याच राजकीय पुढाऱ्यांनी व पुंजीपतींनी स्वतःच्या स्वार्थासाठी कलार-कलाल समाजाचा विश्वासघात केला व बळी घेतला आणि कलाल-कलार समाजाला आपल्या पारंपरिक व्यवसायापासुन कोसोदुर लोटले.सरकार मराठ्यांच्या आरक्षणाबद्दल जशी तत्परता दाखवित आहे तशीच तत्परता इतर समाजासाठी सरकार का दाखवित नाही? सरकारला कोणता समाज कीती व कोणत्या समाजाची कीती ताकद आहे हे जर पहायचे असेल तर सरकारने ताबडतोब जातिनिहाय जनगणना करने गरजेचे आहे.राज्यातील मराठा समाज असो वा अन्य समाज त्यांच्या हक्काच्या मागण्या सरकार डावलू शकत नाही.सरकाने कोणत्याही समाजाची मागणी पूर्ण करतांना इतरही समाजांचा गांभिर्याने विचार करायला हवा अन्यथा राज्यात दुफाळी माजेल.सरकारने कोणत्याही समाजाचा विचार करतांना कोणाच्याही दबावाखाली न येता काम केले पाहिजे.आपण पहातो की राज्यातील कोणत्याही गोष्टीचा मार्ग काढण्यासाठी संपूर्ण राजकीय पक्ष व पुढारी एकत्र येत नाही ही सर्वात मोठी खंत आहे.येणाऱ्या निवडणूका पहाता कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांनी फोल आश्वासने देऊ नये.परंतू जो-जो समाज आपल्या हक्कांसाठी लढत आहे त्याचा हक्क त्याला देण्याचे प्रथम कर्तव्य सरकारचे आहे.त्यामुळे सरकारने गेल्या ७६ वर्षांपासून कलार-कलाल समाजाचा हिरावलेला पारंपरिक (मद्य) व्यवसाय कलाल-कलार समाजा परत करायलाच पाहिजे यातच सरकारचे हित आहे.कलार-कलार समाजाची एकच मागणी आहे ती म्हणजे एकतर सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी लागू करावी अन्यथा ५० टक्के दारूचे परवाने कलाल-कलार समाजाला परत करावे.कारण कलाल-कलार समाजाचा मद्य विक्री हा पारंपरिक व्यवसाय आहे.त्याचप्रमाणे सरकारने मराठा समाजाला आरक्षण देतांना ओबीसीच्या आरक्षणामध्ये ढवळाढवळ करू नये.सरकार मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी आरक्षणात एन्ट्री होत असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा दिसून येते.यामुळे ओबीसी विरूद्ध मराठा असा वाद निर्माण होवू शकतो.त्यामुळे मराठा समाजाला वेगळे आरक्षण देवून समाधान पुर्वक निर्णय घ्यावा जेणेकरून पुन्हा वाद निर्माण होवू नये.सध्या राजकीय पुढाऱ्यांच्या वर्चस्वाची लढाई सुरू आहे यात सर्वसान्य समाज भरडल्या जाणार नाही याचीही दक्षता सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी घ्यावी व महाराष्ट्रातील घडामोडीवर केंद्राने सुध्दा नजर ठेवावी.

# जिल्हा आयुष रुग्णालयात श्री धन्वंतरी पूजन व राष्ट्रीय आयुष दिवस समारंभ उत्साहात साजरा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालय आवारातील जिल्हा आयुष रुग्णालय ,अहमदनगर येथे श्री धन्वंतरी पूजन व राष्ट्रीय आयुर्वेद दिवसानिमित्त समारंभाचे आयोजन गुरुवार दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी करण्यात आले. केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या निर्देशाप्रमाणे राष्ट्रीय आयुर्वेद दिवसानिमित्त 'आयुर्वेद सर्वांसाठी, या विषयावर ज्येष्ठ आयुर्वेद तज्ञ डॉ. लक्ष्मीकांत कोर्टीकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करून साजरा करण्यात आला .कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरोग्याची देवता श्री धन्वंतरी मूर्तीचे पूजन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बापूसाहेब नागरगोजे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुग्ण कल्याण समिती सदस्य डॉ अजित फुंदे होते. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ साहेबराव डावरे डॉ श्रीकांत पाठक ज्येष्ठ आयुर्वेद तज्ञ डॉ.लक्ष्मीकांत कोर्टीकर , जिल्हा आयुष अधिकारी डॉ मनोज घुगे, डॉ.दादासाहेब साळुंके ,डॉ. दिलीप पवार, डॉ. झुंजार झांजे ,डॉ. ज्योती



चोपडे,अधिपरिचारिका श्रीमती छाया जाधव आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आयुष अधिकारी डॉ. मनोज घुगे यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी दर्जेदार आयुष चिकित्सा सर्वसामान्य नागरिकांना मिळण्यासाठी आयुष मंत्रालय व सार्वजनिक आरोग्य विभागाने जिल्हा आयुष रुग्णालयाची उभारणी केल्याचे सांगितले. आयुर्वेद , होमिओपॅथी , युनानी , योगतज्ञांद्वारे विविध प्रकारचे निदानपूर्वक उपचार येथे उपलब्ध होणार आहेत . याचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी राष्ट्रीय आयुष्य दिनानिमित्त आयुर्वेद शास्त्राचे प्राचीन काळापासून स्वास्थ्यरक्षणासाठीचे योगदान सांगितले. राज्यात सर्वप्रथम अहमदनगर येथे जिल्हा आयुष रुग्णालय उभारले गेले असून याद्वारे तज्ज्ञांचा सल्ला नागरिकांना मिळणार आहे असे सांगितले. ग्रामीण भागातही आयुर्वेद सेवा जिल्हा परिषद आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रांच्या माध्यमातून दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रुग्ण कल्याणसमितीचे सदस्य डॉ. अजित फुंदे यांनी स्व.खा.दिलीप गांधी आणि खा. सुजयदादा विखे पाटील यांच्या प्रयत्नांमुळे अहमदनगर येथे जिल्हा आयुष रुग्णालय प्रत्यक्षात आल्याचे सांगितले. आयुष रुग्णालयासह शासकीय आयुष महाविद्यालयही मंजूर व्हावे यासाठी आपण प्रयत्नशील आहोत असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय आयुर्वेद दिनाच्या कार्यक्रमात नागरिकांसाठी 'सर्वांसाठी आयुर्वेद' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यात मार्गदर्शन करताना डॉ. लक्ष्मीकांत कोर्टीकर यांनी निरोगी राहण्यासाठी आयुर्वेदाचा अंगीकार करण्यास सांगितले. दिनचर्या , ऋतुचर्या आणि आहाराचे नियम पाळल्यास आजार होत नाहीत .प्रत्येकाने आपल्या अग्नी अर्थात पचनशक्तीनुसार आणि प्रकृतीनुसार आहार घेणे आवश्यक आहे . आजाराच्या उपचारातही पथ्याचे महत्त्व आहे. यासाठी पदवीधर आयुर्वेद तज्ञांचा सल्ला घ्यावा असे त्यांनी सुचवले. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. साहेबराव डावरे , डॉ. श्रीकांत पाठक यांनीही मार्गदर्शन केले. रुग्णालयात आयुर्वेद उपचार घेणारे रुग्ण श्री.सखाराम पंडीत यांनी आपला अनुभव यावेळी सांगितला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयुर्वेद तज्ञ डॉ. शौनक मिरीकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय होमिओपॅथी तज्ञ डॉ. जयश्री म्हस्के यांनी केला.कार्यक्रमाचे आभार योगतज्ञ श्रीमती मोहिनी जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ इर्शाद मोमीन ,डॉ.नाझिया शेख,डॉ. शोभा धुमाळ, श्रीमती माधुरी ठोंबरे, श्रीमती संगीता नन्नवरे , श्री.संतोष आरु, श्रीमती वंदना गायकवाड , श्री.संजय पालवे, श्री.प्रदीप कराड आदिंनी परिश्रम घेतले.

# बिहारमध्ये शक्य आहे ते महाराष्ट्रात का नाही? आरक्षणाची मर्यादा वाढवण्यात यावी–चव्हाण

**मुंबई । प्रतिनिधी**

बिहारप्रमाणे महाराष्ट्रातही आरक्षण मर्यादा वाढवण्यात यावी, अशी मागणी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी केली आहे. बिहार विधानसभेने आरक्षणाची मर्यादा ७५ टक्के करण्याबाबतचे विधेयक काल मंजूर केले. याबाबत प्रतिक्रिया देताना अशोक चव्हाण यांनी आज ही मागणी केली.अशोक चव्हाण म्हणाले की, जे बिहारमध्ये शक्य आहे ते महाराष्ट्रात का नाही? राज्य विधीमंडळाच्या आगामी हिवाळी अधिवेशनात महायुती सरकारने महाराष्ट्रातही आरक्षण मर्यादा शिथिल करण्याबाबत पावले उचलावीत; जेणेकरून मराठा आरक्षणाचा मार्ग सुकर होऊ शकेल. बिहारच्या या विधेयकाला तेथील भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी पाठिंबा दिल्याचेही अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे.अशोक चव्हाण म्हणाले की, देशात जातनिहाय जनगणना करावी आणि आरक्षणाची मर्यादा शिथिल करावी, ही भूमिका काँग्रेस पक्षाने अगोदरच स्वीकारली आहे. हैद्राबाद व नवी दिल्ली येथे झालेल्या काँग्रेस कार्यसमितीच्या



बैठकीत तसे ठरावही मंजूर करण्यात आले आहेत. आता याबाबत राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. आता राज्य सरकार यावर काय भूमिका घेते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.बिहारमध्ये जातनिहाय जनगणनेची आकडेवारी जाहीर केल्यानंतर राज्य सरकारने गुरुवारी आरक्षण दुरुस्ती विधेयक–२०२३ सर्वानुमते मंजूर करुन घेतले आहे. विरोधी पक्ष भाजपनेही याचे समर्थन केले. यात आरक्षणाची व्याप्ती ६०% ने वाढवून ७५% केली आहे. जातनिहाय जनगणनेनुसार, बिहारमध्ये मागासवर्ग व अति मागासवर्गीयांची एकूण लोकसंख्या ६३.१३% आहे. या वर्गाला आता सरकारी नोकऱ्यांत ४३% आरक्षण मिळेल. आधी ते ३०% होते. तसेच अनुसूचित जाती वर्गाचा कोटा वाढवून २०% केला आहे. आता हे विधेयक विधान परिषदेत सादर होईल. नंतर राज्यपालांना पाठवले जाईल. राज्यपालांच्या मंजुरीनंतरच त्याचे कायद्यात रूपांतर होईल.बिहारमध्ये जातनिहाय जनगणनेची आकडेवारी जाहीर केल्यानंतर आरक्षणाची मर्यादा ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी घेतला आहे. त्यानुसार महाराष्ट्रातही जातगणना करून आरक्षण मर्यादा वाढवण्याचा कायदा करा, अशी मागणी कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे. तसे केल्यास मराठा समाजाला स्वतंत्र १० ते १२ टक्के आरक्षण देणे शक्य होईल व मराठा–ओबीसी वादही संपुष्टात येईल, असा सल्ला त्यांनी आपल्याच सरकारला दिला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवारांनीही जातगणनेस अनुकूल असल्याचे यापूर्वीच सांगितले होते.

# सहा जणांनी मराठा समाजाचे वाटोळे केले – मनोज जरांगे

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

तुमची विचारधारा मराठ्यांविषयी विष पेरणारी असून मराठ्यांचे मुडदे पाडायला तुम्ही जबाबदार आहात, असा घणाघाती आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर केला आहे. सहा जणांनी आमचे वाटोळं केले, त्या सहा लोकांची नावे येत्या २४ तारखेला सांगतो, असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. 'तुम्ही कुणासाठी काम करता हे आम्हाला आता कळाले असून तुमच्या सल्ल्याची आम्हाला गरज नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. वेळोवेळी वेगवेगळी वक्तव्य करून वडेट्टीवार सरड्यासारखे रंग बदलत असल्याचेही जरांगे यांनी म्हटले आहे. तुमच्यासारखा विरोधी पक्ष देशात कुणी नाही, तुमची विचारधारा मराठ्यांविषयी विष पेरणारी असून मराठ्यांचे मुडदे पडायला तुम्ही जबाबदार असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी वडेट्टीवार यांच्यावर केला आहे.मराठा आरक्षणावरून राज्यात आंदोलन सुरु असताना विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्याला मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. विशेष म्हणजे या आधी ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यासोबतही मनोज जरांगे पाटील यांचे शाब्दीक युद्ध सुरु आहे. त्यात आता काँग्रेसमधील ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांच्यासोबतही मनोज जरांगे पाटील यांच्यात शाब्दीक वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.सरसकट मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या, ही मनोज जरांगे पाटील यांची मागणी अतिशय चुकीची आहे. यामुळे मराठा समाजाचेच मोठे नुकसान होणार आहे. मात्र, मनोज जरांगेंची राजकीय फायदा उपटण्याची मनषा असल्यामुळेच ती ही मागणी रेटून धरत आहे, असा थेट आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला होता. यावर मनोज जरांगे पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे.विजय वडेट्टीवार यांच्या वर पलटवार करताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, अशा लोकांना गोरगरीब आठवत नाही. मात्र आता हे कुणासाठी काम करता हे कळले आहे. कधी काय तर कधी काय? तुम्ही सरड्यासारखे रंग बदलत आहात. तुमच्यासारखा विरोधी पक्ष देशात कुणी नाही. मुळात यांची विचारधारा मराठ्यांविषयी विष पेरणारी आहे. हा मनोज जरांगे राजकारणासाठी करतो, असे एकही मराठा ओबीसी म्हणू शकत नाही. तुम्हाला मराठा समाजशिवाय माया नाही, काय करायचे हे तुम्ही आम्हाला सांगू नका. आमच्या मुलांना तुम्ही सांगायची गरज नाही. तुमच्यासारख्या लोकांनीच आम्हाला संपवले आहे. आम्हाला मोडायचा सामूहिक कट तुम्ही रचला होता. आता फालतू शब्द बोलून लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करत आहेत, पण हे होऊ देणार नाही.५ ते ६ जण काय नमुने आहेत, हे आता आम्हाला कळले आहे. त्यामुळे तुम्ही आता मराठ्यांचे शत्रू झाला आहात. आता कुणबी नोंदीचे पुरावे मिळू लागले म्हणून काहीही बोलू लागले आहेत. मराठा समाजाचे वाटोळे करणाऱ्या त्या ६ जणांचे नाव २४ तारखेला सांगतो, असा इशारा देखील मनोज जरांगे पाटील यांनी या वेळी बोलताना दिला आहे.मनोज जरांगे पाटील यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर टीका करताना काँग्रेसचाही समाचार घेतला. असा विरोधी पक्ष कधीही पाहिला नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर राहुल गांधींनी हेच शिकवले का? असा प्रश्न उपस्थित करत मनोज जरांगे पाटील यांनी काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्त्वावरही टीका केली आहे.

# अजित पवारांचे मंत्री शरद पवारांच्या भेटीला दिलीप वळसे पाटलांकडून दिवाळीच्या शुभेच्छा



**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी आणि अजित पवार गटाचे नेते सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवार यांची भेट घेतली आहे. शरद पवार यांची भेट घेण्यासाठी ते मोदीबाग येथे गेले होते. शरद पवार यांचे निकटवर्तीय म्हणुन दिलीप वळसे पाटील यांची राजकारणात आधीपासूनच ओळख आहे. दिवाळी निमीत्त शुभेच्छा देण्यासाठी त्यांनी शरद पवारांची भेट घेतली. या भेटीत दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवारांसोबबत चर्चा देखील केली, त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी शरद पवारांसोबतच्या भेटीमुळे संभ्रम निर्माण होण्याचे कारण नसल्याचे वळसे पाटील यांनी स्पष्ट केले. ही पुर्वनियोजित भेट होती, असेही दिलीप वळसे पाटल यांनी म्हटले आहे.शरद पवार यांच्या भेटीचे कारण माध्यमांच्या प्रतिनिधींनी दिलीप वळसे पाटील यांना विचारले होते. त्यावेळी ही भेट पुर्वनियोजित असल्याचे वळसे पाटील यांन स्पष्ट केले. रयत शिक्षण संस्थेचे अनेक पदाधिकारी देखील त्यांच्या सोबत होते. रयत शिक्षण संस्थेच्या निमीत्ताने ही भेट झाली असून या भेटीमागे वेगळे कारण नाही, असेही दिलीप वळसे पाटील यांनी म्हटले आहे.या भेटीसंदर्भात सांगताना दिलीप वळसे पाटील यांनी म्हटले की, मी अनेक संस्थांमध्ये काम करतो, त्या संस्थांच्या कामासाठी शरद पवार यांचे मार्गदर्शन नेहमीच घेत असतो. सहकारी संस्थांचे काही प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून काही निर्णय घेण्यात आले आहेत, ते शरद पवार यांच्या कानावर घातले असल्याची माहिती देखील दिलीप वळसे पाटील यांनी दिली. ते म्हणाले की, सामाजिक संस्थामध्ये राजकारण नाही, शरद पवार यांनी तेथे कधीच राजकारण आणले नाही. राजकीय भूमिका हा वेगळा प्रश्न आहे, आणि संस्था या समाजाच्या आहेत. सर्वच संस्थांमध्ये सर्व पक्षांचे लोक आहेत. त्यामुळे इथे देखील वेगळे काही नाही असंही ते म्हणाले.संस्थात्मक राजकारणात आंतिम शब्द कोणाचा? असा प्रश्न पत्रकारांनी दिलीप वळसे पाटील यांना विचारला होतो. त्या वरही दिलीप वळसे पाटील यांनी उत्तर दिले आहे. ते म्हणाले की, संस्थात्मक राजकारणात शरद पवार अनेक ठिकाणी अध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांचाच अंतिम शब्द आहे.नुकत्याच राज्यात ग्रामपंचायत निवडणुका झाल्या आहेत. यात दिलीप वळसे पाटील यांना त्यांच्याच गावातील ग्रामपंचायत गमवावी लागली आहे. यावरही त्यांनी सडेतोड उत्तर दिले. ते म्हणाले की, 'मी अजून गावाला गेलो नाही. २४ ग्रामपंचायत निवडणूका आमच्याकडे आहेत. ४ स्थानिक आणि २ शिंदे गटाला मिळाल्या आहेत. थोडा बदल झाला आहे. काही स्थानिक प्रश्नांमुळे बदल झाला असावा, मी गावाला गेलो की ग्रामस्थांशी चर्चा करेन' असे दिलीप वळसे पाटील यांनी म्हटले आहे.

# रूग्णांना दीपावली फराळ वाटप करून प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने रुग्णांची दिवाळी केली गोड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वा रा ती च्या रुग्ण व नातेवाईक यांची देखील दिवाळी त्याना फराळाचे वाटप करत प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गोड करण्याचा प्रयत्न केला आहे. अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक आणि व्यायाम मंडळाने सलग ३५ व्या वर्षी स्वा रा ती मधील रुग्णांना दीपावलीच्या निमित्ताने फराळ वाटप करत आले आहे.मागील ३५ वर्ष अविरतपणे प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे रुग्णसेवेची सामाजिक परंपरा जोपासण्याचे कार्य करीत आहे. हीच परंपरा पुढे जोपासत आज शुक्रवार दि.१० नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रूग्णालय येथील रूग्णांना प्रियदर्शनी सांस्कृतिक मंडळाचे संस्थापक सचिव राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी अनेक सहकाऱ्यांच्या उपस्थितीत दिवाळी फराळ वाटप केला . गेल्या ३५ वर्षापासून आजपर्यंत अखंडीतपणे स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील रूग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना दिवाळी फराळ वाटपाची परंपरा प्रियदर्शनी क्रीडा मंडळाची आहे. आपण दीपावलीच्या सणापासून कुठेतरी दूर आहोत अशी भावना रूग्णांची व नातेवाईकांची होवू नये या सामाजिक दायित्वातून तसेच रुग्ण व नातेवाईक यांची रुग्णालयातील मानसिकतेतून त्यांना बाहेर काढून त्यांच्या चेहऱ्यावर



हास्य फुलविण्याची परंपरा मंडळाने सुरू झालेली आहे. दीपावली निमित्त फराळ वाटपात गेली ३५ वर्ष सातत्य टिकवलेले आहे. राजकिशोर मोदी यांनी १९८९ साली प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतीक व व्यायाम मंडळाची स्थापना केली. तेंव्हाच्या सर्व तरूण सहकार्यांनी एकत्र येवून मंडळामार्फत विविध प्रकारची सामाजिक उपक्रम , विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा मानस केला होता .त्याचाच एक भाग म्हणून स्वा रा ती येथील रुग्णांसाठी हा दिवाळी फराळ वाटपाचा कार्यक्रम सुद्धा सुरू केला. ज्याचा सकारात्मक परिणाम रुग्ण व रूग्णांचे नातेवाईक यांच्यावर झाला.राजकिशोर मोदी हे सातत्याने वेगवेगळ्या घटक व विविध विषयांवर काम करत आहेत.ज्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड , महारक्तदान शिबीर,कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य वाटप, कोरोना योद्धा सन्मान, निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी वॉकेथॉन ही व अशी अनेक सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य सातत्याने सुरू असून याकामात त्यांना सर्व सहकार्यांचे पाठबळ मिळत आहे. म्हणूनच हा उपक्रम आजतागायत अविरतपणे सुरू आहे. दिवाळी फराळ वाटप करत असताना रूग्णांना दीपावली च्या शुभेच्छा देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याचे काम देखील राजकिशोर मोदी आणि त्यांचे सहकारी करत होते .या फराळ वाटपाच्या कार्यक्रमास राजकिशोर मोदी यांच्या समवेत अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे, डॉ. राकेश जाधव, ऍड विष्णुपंत सोळंके, मनोज लखेरा, तानाजी देशमुख , महादेव आदमाने, अमोल लोमटे, संतोष शिनगारे , दिनेश भराडीया, धम्मा सरवदे , सुनील व्यवहारे , सुनील वाघाळकर , गणेश मसने, कचरू सारडा, विष्णू पांचाळ,बबन पानकोळी, रुपेश चव्हाण, अशोक देवकर, काझी खायमिद्दीन, विजय रापतवार, हर्षवर्धन वडमारे,राजू मोरे, सुधाकर टेकाळे, रफिक गवळी, दत्ता सरवदे,गोविंद पोतंगले, खलील जाफरी, सय्यद ताहेर, सचिन जाधव , जावेद गवळी, विशाल पोटभरे, आकाश कऱ्हाड, महेश कदम, संतोष चिमणे, शुभम लखेरा,कैलास कांबळे, तौफिक सिद्दीकी, जमादार पठाण,शाहिद शेख, महेबूब गवळी, महेश वेडे, उज्जेन बनसोडे, विशाल जगताप, गुड्डू जोगदंड, अमोल मिसाळ , अजीम जरगर , गोविंद टेकाळे, शुभम लखेरा,सुशील जोशी, रोहन कुरे, रोहित देवकर, महेश वेदपाठ, आशिष ढेले, जावेद भाई आदीसह प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे सहकारी , राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि राजकिशोर मित्र मंडळाचे सर्व सहकारी सदस्य उपस्थित होते.

# असा विरोधी पक्षनेता असतो का?; मनोज जरांगे पाटलांचा विजय वडेट्टीवारांवर हल्लाबोल





**जालना । प्रतिनिधी**

विरोधी पक्षनेता आणि विधिमंडळ हे न्यायमंदिर आहे. आता त्यांना स्वत:च्या जातीविषयी गर्व झालाय, असा घटनेतला विरोधी पक्षनेता असतो का? सरकारनं न्याय दिला नाही तर विरोधी पक्षनेता प्रचंड मोठा आवाज उठवतो आणि सरकारला झुकवतो.

तुमचे विचार कसे पाहिजे, राहुल गांधींनी हे शिकवले का? मराठ्यांविरोधात आवाज उचलतो, त्यासाठी राहुल गांधींनी पद दिलंय का असा घणाघात मनोज जरांगे पाटील यांनी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यावर केला आहे.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, २४ तारखेनंतर सगळ्यांना दाखवतो, माझ्या गोरगरिब लेकरांना आरक्षण द्या, ही धमकी समजता का? मराठ्यांना आरक्षण देऊ नका असं म्हणतात, राहुल गांधींनी मराठ्यांविरोधात बोलण्यासाठी तुम्हाला पाठवले का? विरोधी पक्षनेता कुणाचा नसतो, तो जनतेचा आवाज असतो. क्षत्रीय मराठ्यांविरोधात बोलला तर तुझ्या पाठीवर थाप टाकू असं राहुल गांधींनी सांगितलंय का? आम्ही बोललो, धमकी कुठे दिली. सरकारला वाईट बोलले तर तुम्हाला काय झालं? तुमच्या राजकारणात आम्हाला का डाग लावताय? राजकारणासाठी करत असतो तर मराठवाड्याला आरक्षण मिळत असताना समितीला राज्यभरातील मराठ्यांसाठी काम करायला लावलं नसतं. माझा मराठा समाज कानाकोपऱ्यात एक झालंय याचा मला आनंद आहे असं त्यांनी म्हटलं.तसेच आम्ही हिरो झालो नाही, स्वत:ला हिरो मानत नाही. मराठ्यांनी आम्हाला स्वीकारले आहे. सत्ताधारी, विरोधी पक्षाकडून आम्हाला मोडायला निघाले होते, आंदोलन संपवायचे होते. लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. परंतु उभा हयातीत मराठ्यांमध्ये तुम्हाला संभ्रम निर्माण करता येणार नाही. तुमची पिढीसुद्धा मराठ्यात संभ्रम निर्माण करू शकत नाही. राजकारणासाठी कोण काय करतंय हे मराठ्यांना चांगले माहिती झाले आहे. तुमच्याबद्दल तर खूप झालंय, तुमचे सल्ले देण्याची गरज नाही. जालनात ओबीसीतून आरक्षण देण्याचं तुम्ही बोलला होता, परंतु तिथून निघाल्यावर सरड्यासारखा रंग बदलला हे मराठ्यांनी पाहिले, त्यामुळे आम्हाला तुम्ही सल्ले देऊ नका. असं प्रत्युत्तरही मनोज जरांगे पाटील यांनी विजय वडेट्टीवार यांना दिले.

**काय म्हणाले होते विजय वडेट्टीवार?**

जालनातील गोळीबारानंतर मनोज जरांगे पाटील हिरो झाले, त्यानंतर आता ज्या गोष्टी घडत आहेत. हम झुका सकते है अशा अर्विभावात समाजाचे पाठबळ मिळाल्यानं जरांगे पाटील यांना गर्व झाला, धमक्या द्यायला लागले. नाही केले तर बघून घेऊ, आम्हालाही धमक्या देतात असा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर केला.दरम्यान, मराठा समाजाला (इ डब्लू एस ) मधून १० टक्के आरक्षणाचा फायदा होत असेल तर तो फार मोठा होतोय. परंतु जरांगे पाटलांना त्या फायद्यापेक्षा राजकीय फायदा उचलण्याचा हेतू असावा. ओबीसीत येऊन ३७२ जातींमध्ये समावेश करून त्यांना फार काही फायदा होणार नाही. खुल्या प्रवर्गात फार जाती राहणार नाहीत. यातून मराठा समाजाचे फार मोठे नुकसान होणार आहे असंही वडेट्टीवार म्हणाले होते .

## ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे गरजेचे: माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार

**अहेरी । प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय स्तरावरचा खेळाडू तयार करायचा असेल तर ग्रामीण भागातील खेळाडूंना उत्तम प्रशिक्षण व क्रीडा मैदान उपलब्ध करून दिले पाहिजे.या दृष्टिकोनातून जय गोंडवाना क्लब तर्फे गावपातळीवर आयोजित केलेली व्हॉलीबॉल स्पर्धा प्रशंसनीय आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन माजी जि प अध्यक्ष अजय कंकडालवार यांनी केले.

यावेळी सहउदघाटक म्हणून माजी जि.प.सदस्य सुनीता कूसनाके, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चुटूगुंट्टा ग्रामपंचायतचे सरपंच साधना मडावी, प्रमुख पाहुणे म्हणून अहेरी नगरपंचायतचे नगरसेवक प्रशांत गोडसेलवार माजी जि.प.सदस्य अजय नैताम अशोक येलमुले, सुरेश आत्राम ,वेंकटेश धानोरकर, कालिदास कुसनाके,श्रीकांत समदार,कमल बाला,राकेश सडमेक,गुरुदास कोरेत, मारोती नैताम, गुलाब सडमेक,रविश तलांडे,रंजित कोरेत,किशोर नैताम, पंकज नैताम,दिनेश मडावी आदी उपस्थित होते.पुढे बोलताना गावातील युवा पिढीला क्रीडा क्षेत्रात पुढे जायचे असेल तर विविध खेळात सातत्य राखणे गरजेचे आहे.त्यासाठी गावात भव्य क्रीडांगण आवश्यक असून त्यासाठी स्वतः पुढाकार घेणार असल्याचे सांगितले.व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन होताच अजय कंकडालवार यांनी गावातील विविध समस्यांवर चर्चा केली.तसेच सरपंच, उपसरपंच यांना विकास कामासाठी पुढाकार घेऊन गावाचा विकास साधण्याचे आवाहन केले. दरम्यान जय गोंडवाना क्लब टिकेपल्ली यांच्या वतीने आयोजित व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी गावात पोहोचताच गावकऱ्यांनी पाहुण्याचे ढोल ताशांच्या गजरात भव्य स्वागत केले.

## गोंडपिपरीत काँग्रेस जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

### तालुक्याच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध–आ.धोटे

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**



राजुरा विधानसभा क्षेत्राचा विकास करण्याचे ध्येय उराशी बाळगून समाजकारणातून राजकारणात प्रवेश केला.पाठीशी असलेली जनता हीच माझी खरी ताकद आहे.राजुरा विधानसभा क्षेत्राच्या विकासासाठी अहोरात्र झटलो व झटत राहील गोंडपिपरीतील नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी सेवेसाठी जनसंपर्क कार्यालय नेहमी खुले राहणार.असे प्रतिपादन कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी आमदार सुभाष धोटे यांनी व्यक्त केले. दि.(१०) शुक्रवारी नागरिकांच्या सेवेसाठी तालुका काँग्रेसचे काळे कॉम्प्लेक्समध्ये जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले.यावेळी जिल्हा उपाध्यक्ष देवेंद्र बट्टे,तालुका अध्यक्ष तुकाराम झाडे,सरपंच देविदास सातपुते,कार्याध्यक्ष निलेश संगमवार,शहर अध्यक्ष राजू झाडे,तालुका उपाध्यक्ष नीतेश मेश्राम,ग्रा.पं सदस्य महेंद्र कुनघाटकर,युवक तालुका अध्यक्ष विपिन पेदीलवार,बाजार समिती संचालक संतोष बंडावार,अशोक रेचंनकर,गौतम झाडे,जितेंद्र गोहणे,शंभू येलेकर,महिला तालुका अध्यक्ष सोनी दिवसे,बाजार समिती माजी सभापती सुरेश चौधरी, राजिवसिंह चंदेल यांच्यासह तालुक्यातील शेकडो काँग्रेस पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## लक्ष्मी अशोक रंदये हिला सुवर्णपदक



**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थीनी लक्ष्मी अशोक रंदये हिने भद्रावती येथील निळकंठराव शिंदे इनडोअर स्टेडियम येथे आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत त्वायकांडो या क्रीडा प्रकारात १७ वर्षाखालील वयोगटात सुवर्णपदक पटकावले.आता ती विभाग स्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. लक्ष्मीच्या या यशाबद्दल सर्वत्र तिचे कौतुक करण्यात येत आहे.विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल ढवस व इतर शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुष्पगुच्छ देऊन तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. लक्ष्मी हिला तिचे प्रशिक्षक सतीश खेमस्कर, शिक्षक पुरुषोत्तम श्रीरामे व वडील अशोक रंदये ह्यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

## डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ व मंडळ कृषी अधिकारी शंकरपूर यांचे वतीने जवस लागवड प्रशिक्षण

**चिमूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील डोमा येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत येणाऱ्या अखिल भारतीय समन्वयीत जवस संशोधन प्रकल्प, कृषी महाविद्यालय, नागपूर व मंडळ कृषी अधिकारी शंकरपूर यांच्या वतीने जवस लागवड प्रशिक्षण व बियाणे तसेच निविष्ठा वाटप कार्यक्रम चंद्रपूर जिल्ह्यातील चिमुर तालुक्यातील डोमा गावात ०९ नोव्हेंबर रोजी घेण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भास्कर फरकाडे, कृषी पर्यवेक्षक, कृषी विभाग, शंकरपूर यांनी केले. डॉ. बिना नायर, जवस पैदासकार, अखिल भारतीय समन्वयीत जवस संशोधन प्रकल्प, कृषी महाविद्यालय, नागपूर यांनी जवस पिकाचे औषधी गुणधर्म व आरोग्यातील महत्त्व याबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉ. स्वप्नील ठाकरे, जवस कृषीविद्यावेता, अखिल भारतीय समन्वयीत जवस संशोधन प्रकल्प, नागपूर यांनी जवस पीक लागवड तंत्रज्ञानाबद्दल उपस्थित शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. श्री.माटे, मंडळ कृषी अधिकारी, शंकरपूर यांनी तेलबिया पिकाच्या लागवडीसाठी मार्गदर्शन केले. आदिवासी उप प्रकल्प, अनुसूचित जाती प्रकल्प व प्रथम रेषीय प्रकल्प जवस अंतर्गत डोमा, किटाडी मक्ता व डोंगरगाव या गावातील ८० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली व त्यांना बियाणे व निविष्ठा वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री. रेंगे, कृषी सहाय्यक, कृषी विभाग, शंकरपूर व सरपंच तसेच उपसरपंच, डोमा तसेच ग्रामस्थांनी मदत केली.

## राज्य सरकारच्या वतीने एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड सरसकट ६ हजारांचे बोनस जाहीर

**मुंबई**–एसटी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्यसरकारच्या वतीने यंदा त्यांची दिवाळी गोड करण्यात येणार आहे. कारण, शिंदे सरकारने एसटी कर्मचाऱ्यांसाठी सरसकट ६ हजार रुपयांच्या दिवाळी बोनसची घोषणा केली. एसटी कर्मचारी आणि अधिकारी या सर्वांना ६ हजार रुपयांचा बोनस मिळणार आहे. गेल्या वर्षी कर्मचाऱ्यांना ५ हजार रुपयांचा बोनस जाहीर करण्यात आला होता.शिंदे सरकारने मागच्या वर्षीच्या तुलनेत एसटी कर्मचाऱ्यांच्या बोनसमध्ये एक हजार रुपयांची वाढ केली आहे. एसटी संघटनांनी यंदा दिवाळीचा बोनस सरसकट १५ हजार रुपये देण्याची मागणी केली होती. मात्र, शिंदे सरकारकडून ही मागणी मान्य झालेली नाही. असे असले तरी बोनसमध्ये वाढ झाल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. त्यांची दिवाळी काही प्रमाणात का गोड होणार आहे.सातवा वेतन आयोग आणि विविध मागण्यांसाठी गुणरत्न सदावर्ते यांनी काही दिवसांपूर्वी आंदोलनाची हाक दिली होती. त्याला एसटी कर्मचाऱ्यांनी प्रतिसाद दिला नव्हता. मंत्री उदय सामंत एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींशी संवाद ठेवून होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले होते, की, उदय सामंत कर्मचाऱ्यांशी संपर्कात असून ते यावर तोडगा काढतील.एसटी कर्मचा–यांना बोनस जाहीर झाला आहे. एसटी कर्मचा–यांना ६ हजार रुपये इतका बोनस दिला जाणार आहे. बोनसची रक्कम ऐकून कर्मचारी नाराज झाले आहेत. राज्य सरकारनं एसटी कर्मचा–यांना बोनसच्या रुपात दिवाळी भेट दिली. मात्र, कर्मचाऱ्यांचे समाधान झालेले नाही.सिडकोच्या कर्मचाऱ्यांना छप्पर फाड के बोनस मिळालाय. सिडको कर्मचा–यांना तब्बल ५० हजारांचा बोनस जाहीर झालाय. दिवाळीनिमित्त सिडको प्रशासनाने सिडको कर्मचाऱ्यांना तब्बल ५० हजार रुपयांचा बोनस जाहीर केलाय. महामंडळांमध्ये हा सर्वाधिक बोनस आहे.बोनस मिळताच सिडको कर्मचा–यांनी ऑफिसच्या खालीच फटाके लावले. कर्मचा–यांनी एकमेकांना पेढे भरवत आनंद साजरा केला. या घसघशीत बोनसमुळे सिडको कर्मचा–यांची दिवाळी जोरदार साजरी होणार आहे. तर दुसरीकडे ठाणे महापालिकेनं कर्मचा–यांना २१,५०० तर कल्याण डोंबिवली महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना १८ हजार ५०० रुपयांचा बोनस जाहीर झालाय.

# आमदार किशोर जोरगेवार यांनी अम्मा का टिफिन परिवारासह दिवाळी केली साजरी

### स्नेहमिलन व आरोग्य शिबिर कार्यक्रमाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**





दिवाळीला सुरवात झाली आहे. दिवाळीच्या पहिल्याच दिवशी अम्मा का टिफिन परिवारासोबत दीपावली स्नेहमिलन व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अम्माचा टिफिन परिवारातील सदस्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी आमदार किशोर जोरगेवार, गंगुबाई उर्फ अम्मा जोरगेवार, कल्याणी किशोर जोरगेवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनल आश्राम, डॉ. विवेक देशमुख, डॉ. आदित्य मेहेत्रे, डॉ. दर्शनी मेश्राम, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, बंगाली समाज महिला शहर प्रमुख सविता दंढारे, सायली येरणे, कौसर खान, भाग्यश्री हांडे, शमा काजी, वैशाली मेश्राम, वैशाली मद्दीवार, आशा देशमुख, अस्मिता डोणारकर, माला पेंदाम, कल्पना शिंदे, विमल काटकर, सोनाली आंबेकर, दुर्गा वैरागडे, स्मिता वैद्य, अनिता झाडे, वंदना हजारे, चंदा ईटनकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी दीपावली स्नेहमिलन आणि आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रक्तदाब, मधुमेह व इतर वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्यात. यावेळी नि:शुल्क औषधोपचार करण्यात आला. आमदार किशोर जोरगेवार यांनी अम्मा टिफिन परिवारातील सदस्यांची भेट घेत त्यांना दिवाळी निमित्त फराळ व भेट वस्तू देत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्यात. अम्मा का टिफिन हा उपक्रम यशस्वी करण्यामागे अनेकांचे परिश्रम आहे. याच परिश्रमामुळे खंड न पडता आपण नियमित हा उपक्रम सुरु ठेवू शकलो. आता हा परिवार मोठा झाला आहे. त्यामुळे आपल्या जबाबदा–याही वाढल्या आहेत. या परिवारातील प्रत्येक सदस्य आमच्यासाठी महत्वाचा असुन त्यांना येणा–या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू, येथील सदस्यांच्या आरोग्याकडे आपण विशेष लक्ष देत आहोत. आज आपल्यासह दिवाळी साजरी करतांना आनंद होत असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमात यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.'राहो न कोणी उपाशी अम्मा का टिफिन येई घराशी' असा संकल्प करत आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने अम्मा का टिफिन उपक्रम सुरु करण्यात आला आहे. सदर उपक्रमा अंतर्गत अत्यंत गरजू व्यक्तीला घरपोच जेवणाचा डब्बा पोहचविला जात आहे. आज या परिवातील सदस्यांसोबत आमदार किशोर जोरगेवार यांनी दिवाळी साजरी केली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .